**पंतप्रधानांचे ओमानमधील भारतीय समुदायास संबोधन (18 डिसेंबर 2025)**

18 डिसेंबर 2025

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी आज मस्कत मध्ये भारतीय समुदायाच्या मोठ्या समूहाला संबोधित केले. या श्रोत्यांमध्ये विविध भारतीय शाळांमधील 700 हून अधिक विद्यार्थी उपस्थित होते. हे वर्ष ओमानमधील भारतीय शाळांसाठी विशेष महत्त्वाचे आहे, कारण या देशात त्यांच्या स्थापनेला 50 वर्षे पूर्ण होत आहेत.

2. उपस्थितांना संबोधित करताना पंतप्रधानांनी भारतातील कुटुंबीय आणि मित्रांच्या वतीने समुदायाला शुभेच्छा दिल्या. त्यांनी केलेल्या अत्यंत स्नेहपूर्ण आणि उत्साही स्वागताबद्दल त्यांचे आभार मानले. ओमानमध्ये स्थायिक झालेल्या भारतातील विविध भागांतील लोकांना भेटून आपल्याला आनंद झाला आहे, असे ते म्हणाले आणि विविधता ही भारतीय संस्कृतीचा पाया आहे - ही अशी मूल्ये जी त्यांना कोणत्याही समाजात सहज सामावून घेण्यास मदत करतात. ओमानमधील भारतीय समुदायाकडे किती सन्मान पाहिले जाते याबद्दल बोलताना पंतप्रधानांनी अधोरेखित केले की सहअस्तित्व आणि सहकार्य हे परदेशस्थ भारतीयांचे वैशिष्ट्य राहिले आहे.

3. पंतप्रधानांनी नमूद केले की, भारत आणि ओमान यांच्यात मांडवी पासून मस्कत पर्यंतचे शतकानुशतकांचे संबंध आहेत, जे आज परदेशस्थ भारतीयांच्या मेहनत आणि एकतेच्या माध्यमातून अधिक दृढ होत आहेत. त्यांनी भारत को जनिये या प्रश्नमंजुषा स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी झाल्याबद्दल समुदायाचे कौतुक केले. भारत–ओमान संबंधांमध्ये ज्ञानाचे महत्त्व अधोरेखित करत, त्यांनी देशातील भारतीय शाळांना 50 वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. तसेच, समुदायाच्या कल्याणासाठी दिलेल्या पाठिंब्याबद्दल माननीय सुल्तान हैथम बिन तारिक यांचेही पंतप्रधानांनी आभार मानले.

4. पंतप्रधानांनी यावेळी भारताची परिवर्तनकारी प्रगती आणि विकासाचा उल्लेख करुन सांगितले की या बदलाचा वेग आणि प्रमाण आणि अर्थव्यवस्थेची मजबुती मागील तिमाहीत नोंदवलेल्या 8 टक्क्यांहून अधिक वाढीत दिसून येते. मागील 11 वर्षांत सरकारच्या कामगिरीकडे लक्ष वेधत, त्यांनी देशातील पायाभूत सुविधा, उत्पादन, आरोग्यसेवा, हरित विकास आणि महिला सशक्तीकरण या क्षेत्रांतील परिवर्तनकारी बदलांवर भाष्य केले. ते पुढे म्हणाले की, भारत जागतिक दर्जाच्या नवोपक्रमांची निर्मिती, स्टार्टअप आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत परिसंस्था या क्षेत्रातील प्रगतीच्या आधारे 21व्या व्या शतकासाठी सज्ज होत आहे. पंतप्रधानांनी नमूद केले की, भारताचे UPI – ज्याचा जागतिक पातळीवरील सर्व डिजिटल पेमेंटमध्ये सुमारे 50% वाटा आहे – ही भारतासाठी अभिमानास्पद बाब आहे आणि ते एक यशाचे उदाहरण आहे. पंतप्रधानांनी अंतराळ क्षेत्रातील भारताच्या अलीकडील यशाचा आढावा घेताना, चंद्रावर यशस्वी उतरण्यापासून नियोजित गगनयान मानव अंतराळ

मोहिमेपर्यंतच्या महत्वाच्या कामगिरींचा उल्लेख केला. पंतप्रधानांनी भारत आणि ओमान यांच्यातील अंतराळ क्षेत्रातील सहयोग हा एक महत्त्वाचा भाग आहे असे सांगून तेथील विद्यार्थ्यांना खास युवकांसाठी असलेल्या इस्रोच्या युविका कार्यक्रमात सहभागी होण्याचे आमंत्रण दिले. वस्तू व सेवा ते डिजिटल उपाय यापर्यंत भारत केवळ एक बाजारपेठ नसून जगासाठी एक आदर्श असल्याचे पंतप्रधानांनी अधोरेखित केले.

5. पंतप्रधानांनी परदेशस्थ भारतीयांच्या कल्याणासाठी भारताच्या दृढ वचनबद्धता अधोरेखित करुन सांगितले की, कोठेही आणि कधीही  आमच्या लोकांना मदतीची गरज भासेल, तेथे सरकार त्यांच्या पाठीशी उभे आहे.

6. पंतप्रधानांनी पुष्टी केली की भारत-ओमान भागीदारी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) सहकार्य, डिजिटल शिक्षण, नवोपक्रम भागीदारी आणि उद्योजकता आदानप्रदान यांद्वारे भविष्यासाठी सज्ज होत आहे. त्यांनी तरुण पिढीला मोठे स्वप्न पाहण्याचे, सखोल ज्ञान घेण्याचे आणि धाडसी नवकल्पना करण्याचे आवाहन केले, जेणेकरून ते मानवतेसाठी अर्थपूर्ण योगदान देऊ शकतील. पंतप्रधानांचे संपूर्ण भाषण येथे पाहता येईल [लिंक].

मस्कत

18 डिसेंबर 2025